आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २३ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. हिंसाचाराच्या सहा दिवसांनंतर, नागपुरातून संचारबंदी पूर्णपणे उठवली. पोलीस बंदोबस्त कायम असल्याची पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांची माहिती.

2. सिंहस्थ कुंभमेळयासाठी विशेष प्राधिकरण स्थापन करून विकास आराखडा राबवणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नाशिकमध्ये घोषणा.

3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आली 'आनंदाची' बस.

4. विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी आज वादळीवारा आणि विजेच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता.

संचारबंदी

नागपूरच्या महाल परिसरात धार्मिक प्रतीक जाळल्याच्या अफवेवरून सोमवारी रात्री उसळलेल्या हिंसाचारानंतर पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र सिंघल यांनी नागपूरच्या 11 पोलीस स्टेशनच्या हद्दीतील परिसरांमध्ये संचार बंदीचे आदेश जारी केले होते. परंतु आता 6 दिवसानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून आज दुपारी 3 वाजता पासून नागपुरातील संचारबंदी पूर्णतः उठविण्यात आली आहे. दरम्यान पोलिस आयुक्त डॉ. सिंघल यांनी पोलिस बंदोबस्ताबाबत माहिती दिली.

*आम्ही सगळी परिस्थिती बघून आज संचारबंदी उठवलेली आहे, तीन वाजेपासून आणि सध्या परिस्थिती सामान्य आहे, नॉर्मल आहे आणि आम्ही पाहतो आहे, आमचे सगळे अधिकारी फिल्डवर आहे आम्ही पण फिल्डवर आहे, हे सगळं बघतो आहे आणि सगळ्यांना आवाहन करतो आहे कि कोणी कायदा हातात घेऊ नये, जर काही बोलायचे असेल तर आमचे अधिकारी, कर्मचारी रोडवर आहे. पोलीस स्टेशनमध्ये जाऊन सांगू शकता आणि कुठली माहिती कोणाकडे असतील तर ते ही सांगा. आमची सगळी जसे फोर्स होती ती सगळी फोर्स अजूनही जशी होती तशीच आहे, सगळे पॉईंट्स आमचे जे होते ते पॉईंट सध्या चालू आहेत. तसेच आम्ही बंदोबस्तात कुठलीही कमी केलेली नाही आहे.*

तहसील, कोतवाली, गणेशपेठ आणि यशोधरा नगर या चारही पोलिस ठाण्यांतर्गत संचारबंदी पूर्णतः उठविण्यात आल्याचे निर्देश पोलिसांनी जारी केले आहेत.

कुंभमेळा-मुख्यमंत्री

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं कुंभमेळ्याची पूर्वतयारी वेगाने करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्यात येत असून प्रयागराजच्या धर्तीवर लवकरच कायदा करण्यात येईल अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिकमध्ये आज फडणवीस यांनी कुंभमेळा तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. कुंभमेळ्याची तयारी वेगाने सुरू असून त्र्यंबकेश्वर विकास आराखड्याला मान्यता दिली असल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.....

*सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकचा विकास आपण करतो आहोत तसाच त्र्यंबकेश्वरचाही विकास झाला पाहिजे. कारण त्रंबकेश्वर आपल्या ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रमुख ज्योतिर्लिंग आहे. जवळपास 1100 कोटी रुपयाचा आराखडा तिथला तयार केला आहे. त्याचे दोन टप्पे आम्ही करतो आहोत. पहिला टप्पा जो सिंहस्थापर्यंत आपल्याला पूर्ण करता येईल आणि दुसरा टप्पा जो आहे ज्याच्यामध्ये त्याच्यानंतरही काही काम होतील. याच्यामध्ये दर्शनाकरता कॉरिडोर तयार करणे असेल, पार्किंग ची व्यवस्था असेल, त्या ठिकाणी शौचालयांची व्यवस्था असेल, आपले जे तिथले वेगवेगळे कुंडे आहेत म्हणजे कुशावर्त एक आहेच. पण अजून काही कुंड आहेत, या सगळ्या कुंडांचा रेस्टोरेशन इथल्या काही प्रमुख जी मंदिर आहे त्याचं रिस्टोरेशन करणार आहोत.*

नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामे करण्यात येणार असून पुढच्या महिन्यात या कामाला सुरुवात होईल, असं त्यांनी सांगितलं. कुशावर्त तीर्थाचं पाणी शुध्द करण्यासाठी नगरपालिकेने तयारी केली असून त्यांना लवकर कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे फडणवीस म्हणाले.

अखिल भारतीय प्रतिनिधी सभा

डॉ.आंबेडकर यांच्या संविधानातही धर्माच्या आधारावर आरक्षण स्वीकारलेले नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आरएसएसचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबळे यांनी व्यक्त केले. बेंगळुरूमध्ये संघाच्या तीन दिवसांच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या समारोपप्रसंगी आयोजित पत्रकार परिषदेला ते संबोधित करत होते. होसबळे यांनी संघाच्या १०० वर्षांच्या पूर्ततेला आत्मपरीक्षणाची संधी म्हणून वर्णन केले आणि सांगितले की ही वेळ उत्सव साजरा करण्याची नाही, तर समाजाच्या हितासाठी काम करण्याची प्रतिज्ञा घेण्याची आहे.

वेव्ह

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने (एमआयबी), मीडिया अँड एंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडिया (एमईएआय) च्या सहकार्याने, मुंबईत डब्ल्यूएएम! (WAVES ॲनिमे आणि मँगा स्पर्धा) च्या पुढील आवृत्तीची घोषणा केली आहे. डब्ल्यूएएम! हा 1 ते 4 मे 2025 दरम्यान, मुंबईत होणाऱ्या WAVES (वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल आणि एंटरटेनमेंट समिट) अंतर्गत 'क्रिएट इन इंडिया चॅलेंज'चा एक भाग आहे. डब्ल्यूएएम! च्या मागील आवृत्त्यांचे गुवाहाटी, कोलकाता, भुवनेश्वर, वाराणसी आणि दिल्ली येथे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

## व्याघ्र हल्ल्यातील नुकसान भरपाई

गडचिरोली जिल्ह्यात व्याघ्र हल्ल्यातील मनुष्यहानी टाळण्यासाठी परिस्थितीचा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करून तातडीने विशेष उपाययोजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री तथा गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये गेल्या पाच वर्षात वाघ हल्ल्यातील मृत्युमुखींच्या कुटुंबियांना विशेष नुकसानभरपाई देणे, अतिरिक्त वाघांचे स्थलांतर आदींचा समावेश असून त्याचा अहवाल तीन महिन्यात देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. यासाठी मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यानुसार परदेशी यांनी नागपुरात वरिष्ठ वन अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपाय योजनांवर चर्चा केली आणि त्यावर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

## आनंदाची बस

गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी गावासाठी गावकऱ्यांच्या मागणीनुसार राज्य परिवहन महामंडळाने बस फेऱ्या सुरु केल्या आहेत. ही गावे गडचिरोलीसारख्या शेवटच्या जिल्ह्यातील शेवटच्या टोकाची गावे आहेत. या गावातून ९ किलोमीटर अंतरावर छत्तीसगड राज्य आहे. अशा अतिदुर्गम भागातील गावकऱ्यांची सोय या बसफेऱ्यांमुळे झाली असून ही बस त्यांच्यासाठी 'आनंदाची बस' ठरली आहे. स्थानिक नागरिकांनी रुग्ण, विद्यार्थी आणि आदिवासी नागरिकांच्या सोयीसाठी बस सुरू करण्याबाबत माजी उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली विभागीय नियंत्रक यांना बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार या गावाच्या मार्गावर बसेस सुरू करण्यात आल्या असून बस फेऱ्याही वाढविण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोली जिल्ह्याला स्टील हब बनवून मोठ्या प्रमाणावर उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मागील काही दिवसात अति दुर्गम भागात मुख्यमंत्र्यांनी स्वतः बसमध्ये प्रवास करून गडचिरोली आता नक्षलग्रस्त नाही, तर विकासाच्या मार्गावर गतीने धावणार असल्याचे दाखवून दिले आहे.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये विद्यार्थ्यांची रुची वाढणे आवश्यक आहे. आपण अवगत केलेल्या ज्ञानातून साकारणारे प्रयोग गावांच्या, समाजाच्या समस्या सोडविणारे ठरावेत, अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. नागपूरच्या ब्लाईंड रिलिफ असोसिएशनच्या सभागृहात त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. पाय जॅम फाउंडेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय फ्युचर प्रोग्रामचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उपस्थित होते.

पुरस्कार

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे ऊर्जा क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल गेल्या शुक्रवारी नवी दिल्ली येथे पुरस्कार देण्यात आला. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.

जीएसटी

रासायनिक खतं, कीटकनाशकं, शेतीची औजारं यांच्यासह शेतीसाठीच्या आवश्यक वस्तूंवरचा जीएसटी कर रद्द करावा किंवा त्याचा परतावा द्यावा अशी मागणी अकोला जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांकडून होत आहे. कृषीसंबंधी वस्तूंवर ५ ते २८ टक्क्यांपर्यंत जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर आकारला जातो, त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात हेक्टरी जवळपास १५ हजारांची वाढ झाली असल्याचा शेतकऱ्यांचा दावा असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

हवामान

हवामान! नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार येत्या काही तासात विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी वादळीवारा आणि विजेच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. दरम्यान, आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे 39 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस करण्यात आली असून नागपूरचं कमाल तापमान 37 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस होते. विदर्भात आठवडाभर हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आयपीएल

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये सध्या सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात हैदराबाद इथं सामना सुरू आहे. राजस्थान रॉयल्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैद्राबाद संघानं निर्धारित २० षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात २८६ धावा उभारून राजस्थान रॉयल्सपुढं जिंकण्यासाठी २८७ धावांचं उद्दिष्ट ठेवलं आहे. आजचा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होईल. चेन्नई इथं सायंकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

******